SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416004,
MAHARASHTRA
PHONE:EPABX–2609000, www.unishivaji.ac.in, bos@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४,महाराष्ट्र
दूरध्वनी-ईपीएबीएक्स -२६०९०००, अभ्याससमंडळे विभाग दुरध्वनी ०२३१—२६०९०९४
०२३१—२६०९४८७

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52



जा.क्र.शिवाजी वि. / अमं / 406 दिनांक.02 / 07 / 2025.

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

मा. अधिविभाग प्रमुख,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय** :— सर्टिफिकेट कोर्सेस बाबत.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये सुरू असणारे किंवा सुरू होणारे विविध सर्टिफिकेट कोर्सेस साठी खालीलप्रमाणे SOP (स्थायी संचालन प्रक्रिया) लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच आपल्या महाविद्यालयामध्ये व अधिविभागामध्ये सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्सेस अभ्यासक्रमाची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये दि.10 / 07 / 2025 पर्यंत सादर करावी.

जेणे करून पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. एस. एम. कुबल)
उपकुलसचिव

प्रत—

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

1) संलग्नता टी—2
2) पी.जी. आस्थापना
3) संबंधित परीक्षा विभाग

f:\2018-19\sub commite 2018\etc sub committee lettter.doc

# सर्टिफिकेट कोर्सेससाठी SOP स्थायी संचलन प्रक्रिया

1. महाविद्यालयामध्ये नवीन सर्टिफिकेट कोर्स सुरू करावयाचा असल्यास संबंधित महाविद्यालयाने संलग्नता टी–2 विभागाकडे प्रस्ताव सादर करावा. सदर सर्टिफिकेट कोर्सच्या अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका स्वरूप, मूल्यमापन प्रारूप इत्यादि बाबी ठरविण्यासाठी समिती गठित करण्यात यावी. या समितीमध्ये त्या–त्या महाविद्यालयातील प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली विभागप्रमुखांचा व इतर महाविद्यालयामधून किंवा विद्यापीठामधून तज्ञ सदस्यांचा समावेश करण्यात यावा.
2. महाविद्यालयाने प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रस्तावाबरोबर समितीने तयार केलेले अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका स्वरूप, मूल्यमापन प्रारूप इत्यादी सादर करावे.
3. या कोर्ससाठी श्रेयांक, कोर्सचा कालावधी व एकुण तासिका हे ठरविण्यात यावे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा कालावधी 6 महिन्यांपेक्षा जादा नसावा. हा कालावधी 6 महिन्यांपेक्षा जादा असेल तर UG सर्टिफिकेट कोर्सचे नियम लागू होवू शकतात.
4. 2 श्रेयांक पेक्षा कमी असेल व 30 तास किंवा 30 तासापेक्षा कमी कालावधी असेल तर शॉर्ट टर्म प्रोग्रॅम असावा. सदर अभ्यासक्रम Value added course, MDP, FDP दर्जाचेही असू शकतील.
5. प्रमाणपत्र अभ्यासक्रम किमान 4 श्रेयांकाचे असावेत.
6. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा अंतर्गत मूल्यमापनासह त्या–त्या अधिविभागामध्ये अथवा त्या–त्या महाविद्यालयांमध्ये घेण्यात याव्यात.
7. महाविद्यालयामध्ये असे कोर्स सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव संलग्नता टी–2 विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. विद्यापीठ अधिविभागाकडील प्रस्ताव आस्थापना पीजी विभागाकडे सादर करण्यात येईल. या दोन्ही विभागांनी सदरचे प्राप्त प्रस्ताव अधिष्ठाता मंडळासमोर विचारार्थ ठेवण्याचे आहेत.
8. सदर कोर्सचा अभ्यासक्रम हा अभ्यासमंडळाच्या वतिने रितसर प्रक्रिया पार पाडून मान्य करून संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांना पाठविण्यात यावा.
9. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्याला महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या स्वाक्षरीने आणि विद्यापीठामध्ये संबंधित विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. प्रमाणपत्रावर ग्रेडेशन असावे.
10. संलग्नता टी–2 विभागाने संबंधित महाविद्यालयाला, अधिविभागाला प्रस्तावाची माहिती भरण्यासाठी विशिष्ट फॉर्मेट उपलब्ध करून दयावा. हा फॉर्म विद्यापीठ वेबसाईटवर Affiliation च्या लिंकवर उपलब्ध करून दयावा.
11. प्रस्तावाच्या फॉर्ममध्ये विद्यार्थी प्रवेश क्षमता, शुल्क, श्रेयांक, मूल्यमापन पध्दती इ. सर्व बाबी समाविष्ट असाव्यात.



SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR शिवाजी विद्यापीठ

12. अध्यापनासाठी आवश्यक असणा–या शिक्षकांची उपलब्धता, भौतिक सुविधा, आवश्यकतेनुसार प्रयोगशाळा उपलब्ध असाव्यात.
13. संलग्नता प्राप्त झाल्यानंतर अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती असावी. संबंधित/अभ्यासमंडळाचे अध्यक्ष तसेच अधिविभागातील/महाविद्यालयातील शिक्षक हे सदस्य असतील. या उपसमितीने प्रस्तावाची छाननी करून अधिष्ठाता मंडळाला शिफारस करावी.
14. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना एकाचवेळी त्या–त्या अभ्यासक्रमाबरोबरच या कोर्ससाठी देखील प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमासाठी लिव्हींग सर्टिफिकेट, ट्रान्स्फर सर्टिफिकेटची आवश्यक असणार नाही.
15. कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी संबंधित क्षेत्रातील उद्योगसंस्था व तज्ञ यांच्याशी संबंधित महाविद्यालय व अधिविभाग यांनी समन्वय साधावा व सहचर्य निर्माण करावे.
16. दर तीन वर्षांनी अथवा त्यापेक्षा कमी कालावधीत आवश्यकतेनुसार सदरचे अभ्यासक्रम सुधारित करण्यात यावेत.

02/6/24

DEPUTY REGISTRAR,
Shivaji University, Kolhapur.